**सी.एन.आर.क्र.एम.एच.एस.आय ०७००००८४१२०१२**

**नि.दि.मु.क्र.३३/२०१२ मधील नि.क्र.९३ (आय.ए.क्र.१/२०२२) वरील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज वादी क्र.१ तर्फे नि.क्र.९२ कडील त्याचे अर्जावर पारित करण्यात आलेल्या आदेशानुसार त्याला दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी याकरीता दाखल केलेला आहे.

०२. वादी क्र.१ तर्फे थोडक्यात कथन असे की, प्रस्तुत कामी त्याचा नि.क्र.९२ कडील अर्ज मंजूर केलेला आहे. परंतु, अनावधानाने त्याचेकडून नि.क्र.९२ वर पारित करण्यात आलेल्या आदेशानुसार दुरुस्ती करण्यात आलेली नाही. सदर दुरुस्ती न केल्यास त्याचे कधीही पैशाने भरुन न येणारे नुकसान आहे. सबब, वादी क्र.१ ची विनंती अशी की, त्याला नि.क्र.९२ वरील आदेशानुसार दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी.

०३. प्रस्तुत अर्जास प्रतिवादी क्र.१ व २ यांचे तर्फे आक्षेप असा की, वादी मुद्दामहून विलंब करीत आहेत. त्याकारणे, त्यांचे तर्फे विनंती अशी की, सदर अर्ज फेटाळण्यात यावा.

०४. अभिलेखाचे अवलोकन करीता असे दिसून येते की, वादी क्र.१ याने नि.क्र.९२ कडील अर्ज हा मयत वादी क्र.२ हिचे वारसांना प्रस्तुत दाव्याचे कामी पक्षकार म्हणून सामिल करुन घेवून, त्याअनुषंगाने दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी याकरीता केला होता. वादी क्र.१ याचा सदरचा अर्ज मंजूर करण्यात आलेला होता व त्यास तशी दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात आलेली होती. परंतु, त्याचेकडून विहीत मुदतीत तशी दुरुस्ती करण्यात आलेली

नाही. प्रस्तुत अर्जामध्ये वादी क्र.१ याने तशी दुरुस्ती ही अनावधानाने केली नसल्याचे कथन केले आहे. वादी क्र.१ तर्फे कथन केलेले सदर कारण संयुक्तिक वाटत नाही. परंतु, न्यायाचे कारणास्तव प्रस्तुत दाव्याचा गुणदोषांवर कायमपणे निकाल होण्याकरीता, नि.क्र.९२ वरील पारित झालेल्या आदेशानुसार वादी क्र.२ हिचे वारसांना सामिल करुन घेवून त्याअनुषंगे दुरुस्ती करण्याची परवानगी वादी क्र.१ यास दिली जाणे आवश्यक आहे असे माझे मत आहे . नैसर्गिक न्याय तत्वांच्या दृष्टिकोनातुन विचार केल्यास, वादी क्र.१ यास तशी दुरुस्ती करण्याची संधी देणे हे न्यायदानाच्या दृष्टीने अपरिहार्य आहे . वादी क्र.१ यास तशी संधी दिल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होण्याची शक्यता दिसून येत नाही . उलटपक्षी, प्रस्तुत प्रकरण कायमपणे गुणदोषांवर निकाली होण्यास मदतच होईल व निष्कारण न्यायालयीन प्रकरणे देखील वाढणार नाहीत. प्रतिवादी क्र.१ व २ यांना होणाऱ्या त्रासाचा विचार करता , त्यांना योग्य तो खर्च देवून न्यायाचा समतोलही राखता येईल. सबब, मी वरील चर्चित कारणांकरिता पुढील आदेश पारित करीत आहे :–

**– आदेश –**

१. प्रस्तुतचा अर्ज नि.क्र.९३ हा वादी क्र.१ याने प्रतिवादी क्र.१ व २ यांना प्रत्येकी रु.१००/– (रक्कम रुपये शंभर) इतका खर्च पुढील नेमले तारेखस किंवा तत्पुर्वी देण्याच्या अटीवर अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. सदर खर्चाची रक्कम वादी क्र.१ याने प्रतिवादी क्र.१ व २ यांना वर म्हणल्याप्रमाणे दिल्यानंतरच , त्याला नि.क्र.९२ वरील आदेशाप्रमाणे प्रस्तावित दुरुस्ती करता येईल.

ADITYA G NAIK Digitally signed by ADITYA G NAIK Date: 2022.03.07 17:01:15 +0530

ठिकाण : मालवण, आदित्य घ. नाईक

दिनांक : ०७/०३/२०२२ सह दिवाणी न्यायाधीश (क–स्तर), मालवण